# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

## (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखा)

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्रं.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

---

**विषय -** कोरोना विषाणू (कोव्हीड19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.

**वाचावे -**
1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005
2. साथ रोग अधिनियम, 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. कोरोना/ 2020/ प्र.क्र. 58/ आरोग्य 5, दि.14/03/2020
4. जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्र. डी.सी./कार्या 9 ब 1/465/2021, दि. 22/02/2021.
5. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. डीएमयु/2020/सी.आर.92-डीआयएसएम - 1, दि. 24/02/2021.
6. जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्र. डी.सी./कार्या 9 ब 1/686/2021, दि. 16/03/2021
7. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. डीएमयु/2020/सी.आर.92-डीआयएसएम - 1, दि. 27/03/2021.
8. जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्र. डी.सी./कार्या 9 ब 1/829/2021, दि. 28/03/2021

| क्र.आव्यमपु/कार्या 19अ/292/2021 | **आदेश** | अहमदनगर दिनांक- 29 /03/2021 |
|---|---|---|

ज्याअर्थी, साथरोग अधिनियम 1897 कलम 2 (1) नुसार जिल्हाधिकारी अहमदनगर यांना अहमदनगर जिल्हा कार्यक्षेत्रात कोवीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 7 चे आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उघडणे (मिशन बिगीन अगेन) संदर्भातील मार्गदर्शक सूचनांची दि.15/04/2021 पर्यंत अंमलबजावणी करणेबाबत आदेशीत केलेले आहे. संदर्भ क्र. 8 अन्वये अहमदनगर जिल्हयात कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखणेकामी प्रतिबंधात्मक आदेश लागू करणेत आलेले आहेत.

ज्याअर्थी, अहमदनगर जिल्हयात कोरोना संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊ न देणेकामी अहमदनगर जिल्हयातील इयत्ता 10 वी व 12 वी चे वर्ग वगळता सर्व सरकारी व खाजगी शाळा बंद करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर साथरोग अधिनियम 1897 व आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अहमदनगर जिल्हयात कोरोना विषाणू (कोविड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजना म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी **अहमदनगर जिल्हयातील इयत्ता 10 वी व 12 वी चे वर्ग वगळता सर्व सरकारी व खाजगी शाळा दिनांक 30/03/2021 पासून दिनांक 30/04/2021 पर्यंत बंद ठेवणेबाबत या आदेशाव्दारे आदेशित करीत आहे.**

कोणतीही व्यक्ती/संस्था/संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास ते साथरोग अधिनियम 1897 मधील तरतूदीनुसार भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860)च्या कलम 188 नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

जिल्हाधिकारी अहमदनगर
सत्यमेव जयते
अहमदनगर

**स्वाक्षरी /-**
**(डॉ. राजेन्द्र व. भोसले)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**अहमदनगर**

प्रति - 1) शिक्षणाधिकारी, प्राथमिक/माध्यमिक, जिल्हा परिषद, अहमदनगर
2) सर्व संबंधीत शाळांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, अहमदनगर जिल्हा

प्रत - 1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर
2) पोलीस अधिक्षक, अहमदनगर
3) मुख्य कार्यकारी अधिकारी, छावणी मंडळ, अहमदनगर
4) आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर
5) जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांचेकडेस माहिती व प्रसिध्दीसाठी.
6) उपविभागीय अधिकारी (सर्व), जि. अहमदनगर
7) तहसिलदार तथा घटना व्यवस्थापक (सर्व), जि. अहमदनगर
8) मुख्याधिकारी नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व), जि. अहमदनगर

**(संदीप निचित)**
**निवासी उपजिल्हाधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**अहमदनगर**